# ठाणे महानगरपालिका ठाणे
## जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील **अधिष्ठाता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता, दंत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी** या संवर्गातील रिक्त पदे नियमित वेतनश्रेणीत भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने त्यांचे अर्ज दि.०१/०२/२०२० ते दि.२४/०२/२०२० रोजीचे रात्री २३:५९ वा. पर्यंत संपूर्ण तपशीलासह भरावीत व अर्जात नमूद केलेली प्रमाणपत्रे अपलोड करावीत. (**संकेतस्थळावर ई-सुविधा या सदराखाली भरती (Recruitment) येथे क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link For Applying For the Post of Dean, Medical Officer Of Health, Professor, Associate Professor, Lecturer, Dental Medical Officer & Medical Officer (अधिष्ठाता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता, दंत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी)) या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे**. अर्जासोबत नमुद केलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.

| पदनाम | वयोमर्यादा | वेतन बॅंड अधिक ग्रेड पे | एकुण जागा | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| अधिष्ठाता (वर्ग १) (राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय) | किमान ५० वर्ष | रु.३७४००-६७००० अधिक ग्रेड पे रु.१००००/- | एकुण - ०१ एकाकी पद | १). मान्यता प्राप्त विद्यापीठाची वैद्यक क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी व इतर शैक्षणिक पात्रता.<br>२). मान्यता प्राप्त वैद्यकीय महाविद्यालय अथवा संस्थेत प्राध्यापक (Professor) किंवा सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) किंवा रिडर (Reader) यापैकी कोणत्याही पदावर काम केल्याचा १० वर्षाचा अनुभव व त्यापैकी किमान ५वर्षे विभागात प्राध्यापक (Professor) म्हणून काम केलेले असणे आवश्यक. विभागाचा प्रमुख (Head of Department) म्हणून काम केलेल्यांना प्राधान्य. |
| वैद्यकीय आरोग्य अधिकारी (वर्ग १) | किमान ४० वर्ष | रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड पे रु.७६०० | एकुण - ०१ एकाकी पद | १). मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस.पदवी रोग प्रतिबंधक व सामाजिक औषध शास्त्र विषयातील (पी. एस. एम.) पदव्युत्तर पदवी किंवा शासन मान्य सार्वजनिक आरोग्य विषयातील पदविका(डि . पी. एच.).<br>२).स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरोग्य अधिकारी या पदाचा दहा वर्षाचा अनुभव किंवा वैद्यकीय अधिकारी म्हणून शासनाकडील रुग्णालयातील १५ वर्षाचा अनुभव. |
| प्राध्यापक (वर्ग -१) | कमाल ४५ वर्ष | रु.३७४००-६७००० अधिक ग्रेड पे १०,०००/- | **एकुण ०५**<br>बायोकेमिस्ट्री - १<br>चेस्ट टि.बी. - १<br>इ.एन.टि. - १<br>पॅथोलॉजी.- १<br>सायकॅट्री - १ | १)संबधीत विषयातील मान्यता प्राप्त संस्थेची पदवी<br>२) मान्यता प्राप्त संस्थेची पदव्युत्तर पदवी<br>३) सहयोगी प्राध्यापक या पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) एमसीआयचे नियमानुसार ४ पब्लिकेशन्स् आवश्यक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सहयोगी प्राध्यापक (वर्ग -१) | कमाल ४० वर्ष | रु.३७४००-६७००० अधिक ग्रेड पे ९,००० | **एकुण ०८**<br>सर्जरी - १<br>रेडीओलॉजी - १<br>चेस्ट टी.बी. - १<br>ऑप्थॅल्मोलॉजी - १<br>सायकॅट्री - १<br>ओ.बी.जी.वाय - १<br>स्किन - १<br>फिजिओलॉजी - १ | १) संबधीत विषयातील मान्यता प्राप्त संस्थेची पदवी<br>२) मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवी<br>३) अधिव्याख्याता या पदाचा ४ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) एमसीआय चे नियमानुसार २ पब्लिकेशन्स् आवश्यक |
| अधिव्याख्याता (वर्ग -१) | कमाल ३५ वर्ष | रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ६००० | **एकुण १८**<br>जनरल मेडीसीन-४<br>चेस्ट टी.बी. - १<br>जनरल सर्जरी - २<br>ओ.बी.जी.वाय.- ३<br>पिडियाट्रीक्स - २<br>ॲनेस्थेशिया - २<br>रेडीओलॉजी - २<br>पॅथोलॉजी - १<br>फिजिओलॉजी - १ | १) संबंधीत विषयातील मान्यताप्राप्त संस्थेची पदवी<br>२) मान्यताप्राप्त संस्थेची पदव्युत्तर पदवी.<br>३) एमसीआय चे दि.८ जून २०१७ रोजीचे राजपत्रानुसार मान्यता प्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील संबंधीत विषयाचा ज्युनिअर रेसिडन्ट म्हणून ३ वर्षाचा अनुभव तसेच सिनिअर रेसिडन्ट म्हणून १ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| दंत वैद्यकीय अधिकारी (वर्ग १) | शासन नियमानुसार | रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० | **एकुण ०१** | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.डी.एस. पदवी<br>२) २ वर्षांचा अनुभव |
| वैद्यकीय अधिकारी (वर्ग १) | शासन नियमानुसार | रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० | **एकुण - १३** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमबीबीएस पदवी, अनुभवास प्राधान्य. |

**२ पदनिहाय आरक्षण :-**

१ **अधिष्ठाता ( शासन निर्णयानुसार एकाकी पदाला आरक्षण/अनुशेष लागु नाही.)**

२ **वैद्यकीय आरोग्य अधिकारी (शासन निर्णयानुसार एकाकी पदाला आरक्षण/अनुशेष लागु नाही.)**

३. **प्राध्यापक (पदसंख्या - ०५ )**

| **अ.क्र.** | **तपशील** | **सर्वसाधारण (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त)** | **महिला** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | - | - | - |
| २ | अनु.जमाती | ०१ | - | **०१** |
| ३ | विजा-अ | ०१ | - | **०१** |
| ४ | भज-ब | - | - | - |
| ५ | भज-क | - | - | - |
| ६ | भज-ड | - | - | - |
| ७ | विमाप्र | - | - | - |
| ८ | इमाव | ०१ | ०१ | **०२** |
| ९ | एसईबीसी | ०१ | - | **०१** |
| १० | ईडब्ल्युएस | - | - | - |
| ११ | खुला | - | - | - |
| **एकुण** | | **०४** | **०१** | **०५** |

## ४. **सहयोगी प्राध्यापक - (पदसंख्या - ०८ )**

| अ.क्र. | तपशील | सर्वसाधारण (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | महिला | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ०१ | - | **०१** |
| २ | अनु.जमाती | ०१ | - | **०१** |
| ३ | विजा-अ | ०१ | - | **०१** |
| ४ | भज-ब | ०१ | - | **०१** |
| ५ | भज-क | - | - | - |
| ६ | भज-ड | - | - | - |
| ७ | विमाप्र | - | - | - |
| ८ | इमाव | ०१ | - | **०१** |
| ९ | एसईबीसी | ०१ | - | **०१** |
| १० | ईडब्ल्युएस | ०१ | - | **०१** |
| ११ | खुला | ०१ | - | **०१** |
| **एकुण** | | **०८** | - | **०८** |

## ५. **अधिव्याख्याता - (पदसंख्या - १८)**

| अ.क्र. | तपशील | सर्वसाधारण (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | महिला | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | - | - | - |
| २ | अनु.जमाती | ०२ | ०१ | **०३** |
| ३ | विजा-अ | - | - | - |
| ४ | भज-ब | ०१ | - | **०१** |
| ५ | भज-क | - | - | - |
| ६ | भज-ड | ०१ | - | **०१** |
| ७ | विमाप्र | ०१ | - | **०१** |
| ८ | इमाव | ०४ | ०२ | **०६** |
| ९ | एसईबीसी | ०१ | ०१ | **०२** |
| १० | ईडब्ल्युएस | ०१ | ०१ | **०२** |
| ११ | खुला | ०१ | ०१ | **०२** |
| **एकुण** | | **१२** | **०६** | **१८** |

## ६. **दंत वैद्यकीय अधिकारी** (पदसंख्या - **०१**)

| अ.क्र. | तपशील | सर्वसाधारण (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | महिला | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | - | - | |
| २ | अनु.जमाती | - | - | - |
| ३ | विजा-अ | - | - | - |
| ४ | भज-ब | - | - | - |
| ५ | भज-क | - | - | - |
| ६ | भज-ड | - | - | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | विमाप्र | - | - | - |
| ८ | इमाव | - | - | - |
| ९ | एसईबीसी | - | - | - |
| १० | ईडब्ल्युएस | - | - | - |
| ११ | खुला | ०१ | - | **०१** |
| **एकुण** | | **०१** | - | **०१** |

७. **वैद्यकीय अधिकारी** (पदसंख्या - **१३**)

| **अ.क्र.** | **तपशील** | **सर्वसाधारण (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त)** | **महिला** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | २ | १ | **०३** |
| २ | अनु.जमाती | - | - | - |
| ३ | विजा-अ | - | - | - |
| ४ | भज-ब | - | - | - |
| ५ | भज-क | - | - | - |
| ६ | भज-ड | १ | - | **१** |
| ७ | विमाप्र | - | - | - |
| ८ | इमाव | ३ | २ | **०५** |
| ९ | एसईबीसी | १ | १ | **०२** |
| १० | ईडब्ल्युएस | १ | - | **०१** |
| ११ | खुला | १ | - | **०१** |
| **एकुण** | | **०९** | **०४** | **१३** |

**टिप - वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहतील.**

३ **वयोमर्यादा :**

१ **अधिष्ठाता** संवर्गासाठी किमान वयोमर्यादा ५० वर्ष, **वैद्यकीय आरोग्य अधिकारी** किमान वयोमर्यादा ४० वर्ष राहील.

२. **प्राध्यापक** संवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष, **सहयोगी प्राध्यापक** संवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्ष व **अधिव्याख्याता** या संवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष राहील.

३. **दंत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी** या पदांसाठी उमेदवारांचे वय अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२, दि.२५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

४. शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि. १ नोव्हेंबर २००३ नुसार नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचे करीता वयाची अट पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५/५० पर्यंत राहील.

५. ठाणे महानगरपालिकेच्या स्थायी (कायम) कर्मचा-यांना वयोमर्यादाची अट शिथिल राहील.

४ **शैक्षणिक, व्यवसायीक नोंदणी प्रमाणपत्र व अनुभव अर्हतेबाबतच्या अटी व शर्ती:-**

१ प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव उमेदवाराने अर्जदाखल करण्याच्या अंतिम दिनांकास प्रमाणपत्रांसहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

२ उमेदवाराने महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र XLVI, १९६५) किंवा इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट, १९५६ (१९५६ चा १०२) नुसार त्याचे/तिचे नांव नोंदविणे अनिवार्य आहे.

३. विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापीठ / अभिमत विद्यापीठ (Deemed University) अथवा विद्यापीठ अनुदान आयोग अथवा (AICTE) ने मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थामधील शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

४ उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित संस्था/ कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

५ **सामाजिक व समांतर आरक्षण :-**

१. विमुक्त जाती- अ, भटक्या जमाती- ब, भटक्या जमाती- क, भटक्या जमाती- ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग, खुला प्रवर्गातील महिला या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले नॉन क्रिमीलेअर मूळ प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांना सामाजिक आरक्षणाचा लाभ देण्यात येणार नाही. तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गातील उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे पात्रता प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायाप्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांना आरक्षणाचा लाभ देण्यात येणार नाही.

२ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक असणाऱ्या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटाबाहेरील आहेत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे. असे नमुद केलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेतर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च ) दिलेली आहे त्या वर्षाच्या लगतपुर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमिलीअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधीकाऱ्याने प्रदान केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. त्यापुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही. अर्जामध्ये उन्नत व प्रगत गटाबाहेरील नाही असे नमुद केले असल्यास, नंतर सादर करण्यात आलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र निवडीसाठी ग्राहय धरले जाणार नाही.

३. शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६- ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार ज्या उमेदवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची निवड जात वैधता प्रमाणपत्रा अभावी रद्द करण्यात येईल.

४. **सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) :-** या वर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग क्रमांक सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (ईएसबीसी) वर्गातील आरक्षणाकरीता ग्राहय धरण्यात येतील.

५. **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक :-** या वर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे पात्रता मुळ प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६. जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ उमेदवारांने महाराष्ट्र अनु.जाती , अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या

जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्रधिकाऱ्यांकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे मुळ प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

७. उमेदवारांने अर्जामध्ये जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

८. समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि. १९/१२/२०१८ अन्वये आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

९. समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदांकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरचे पद त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षणविरहित म्हणून भरली जातील.

१०. पात्रता/ आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्टयर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/ आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही.

११. सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, मागासप्रवर्ग/ नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, महिला आरक्षण, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या/येणाऱ्या शासन निर्णयाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात येईल. उमेदवारांनी संबंधीत शासन निर्णयातील तरतूदी अभ्यासूनच आरक्षणाबाबत दावा करावा.

१२. इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांसह) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहे किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे.

१३. शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजा/भज-१, दिनांक १७/०८/२०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

१४. समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३/०८/२०१४ अन्वये आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५. सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आरक्षण संबंधी शासन धोरणात बदल झाल्यास तो त्याप्रमाणे लागू राहील.

**६ महिलांसाठी आरक्षण :-**

१. महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय, क्रमांक/८२/२००१, म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२. खुला आणि मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांनी महिलांसाठीच्या राखीव पदाकरीता अर्ज करतांना महानगरपालिकेतर्फे ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) जाहिरात दिलेली आहे त्या वर्षाच्या लगत पूर्वीच्या वित्तीय वर्षातील,उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले नॉन क्रिमीलेअर मुळ प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना महिला आरक्षणाचा लाभ देण्यात येणार नाही. सामाजिक व समांतर आरक्षण परिच्छेदामध्ये नमूद लागू असणा-या परिच्छेदांचे अवलोकन करुन त्यामध्ये नमूद केलेल्या अटी शर्तीची आवश्यकतेप्रमाणे पुर्तता करणे अनिवार्य राहिल.

३. महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरीता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवाशी असावा.

४. महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

५. महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता आरक्षणाबाबत दावा करणे आवश्यक आहे. तसेच सर्वसाधारण सुचना व अटी शर्ती या खालील **परिच्छेद क्र. ८(६)** मध्ये सुचित केल्याप्रमाणे महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनु.जाती व अनु.जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक राहील.

६ खुल्या प्रवर्गातील उमेदवारांपैकी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील विमुक्त जाती/भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुटुंबातील महिला संदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

## ७ निवड पध्दत :-

१ अनुभवासाठीच्या गुणांच्या मूल्यांकनासाठी ३१/१२/२०१९ हा अंतिम दिनांक राहील.

२ निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार गुणांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/ प्रमाणपत्रे यांच्या स्वसाक्षांकीत प्रती उमेदवाराने अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होऊ शकेल.

३ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं-१२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ, दिनांक १३/०६/२०१८ मधील तरतुदींनुसार, लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यांस प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटुंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणून पात्र ठरविल्याबाबतचा मुळ पुरावा साक्षांकित प्रतीसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

४. प्राप्त अर्जांची छाननी करुन विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

५ समान गुण असणा-या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं/१२१६/(प्र.क्र.६५/१६)/ १३- अ, दि.१३/०६/२०१८ मधील नमूद केलेल्या निकषावर लावला जाईला. तसेच सदरच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार निवडसुचिची कालमार्यादा ०१ वर्षाकरीता विधिग्राहय राहील.त्यानंतर हि निवडसूची व्यपगत होईल.

६ मुलाखती नंतर निवड सूची तयार केल्यानंतर मा. महासभेच्या मान्यतेस अधिन राहून सदर अंतिम निवड सूची ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. या भरतीप्रक्रिये संदर्भातील माहिती व सूचना ठाणे महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यंत कृपया www.thanecity.gov.in ही वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

७ निवड प्रक्रियाच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सुचना दिली जाणार नाही. आधिक माहितीसाठी www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर भरती बाबतची माहिती नियमित पहावी.

८ या जाहिरातीत नमुद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशनाच्या अधिन असेल.

## ८ सर्व साधारण सुचना व इतर अटी व शर्ती :-

१ वरील प्रर्वगनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता असुन त्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका ठाणे यांना राहतील.

२. ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज

स्वीकारण्यासाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३ महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यापुर्वी आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांची पुर्व परवानगी घ्यावी व तसे ना हरकत प्रमाणपत्र, प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४. अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिरातीत नमुद अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकास, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकास धारण करणे / आवश्यक आहे. उमेदवाराने अर्जामध्ये स्पष्टपणे होय (YES) असे नमूद केले असल्यास त्या दाव्याच्या सर्मर्थनार्थ आवश्यक ती कागदपत्रे scan करुन अपलोड करणे अनिवार्य राहील.

५. उपरोक्त पदांसाठी विहीत केलेले अर्ज www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर दि.०१/०२/२०२० ते दि.२४/०२/२०२० रोजीचे रात्रौ २३.५९ वा. पर्यंत उपलब्ध होतील. या कालावधीतच अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तद्नंतर Link उपलब्ध राहणार नाही.

६. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (Domicile certificate) धारण करणे बंधनकारक आहे. अर्जदारांने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधीकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र अर्जदाराने कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दिनांक २७ जुन २०११ नुसार आधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागु राहणारनाही. उमेदवारांकडे आधिवास प्रमाणपत्र तसेच जन्माचा दाखला उपलब्ध नसल्यास शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकारणात देखील अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झ ालेल्या उमेदवारांसाठी लागु राहील इतर उमेदवारांसाठी आदिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

७. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

८ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर, उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्यांचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

९ महापालिकेने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१० मुलाखत व कागदपत्र तपासणीच्या वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वस्वक्षांकित (Self Attested) छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. तथापि निवड झाल्यास आधार कार्डची मुळ प्रत साक्षांकित प्रतिसह सादर करणे अनिवार्य राहील.

११ कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इत्यादी बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवार निवडीसाठी अपात्र होऊ शकेल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार

नाही.

१२ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.

१३ उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी मा. आयुक्त ठाणे महानगरपालिका यांचे कडुन कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल, प्रसिध्दी पत्रक, इत्यादी सर्वसाधारणपणे महानगरपालिकेच्या www.thaneciy.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. त्यामुळे महापालिकेने उमेदवारास भरती प्रक्रीयेमधील बदल उमेदवारास कळविले नाहीत अशा सबबींची दखल घेतली जाणार नाही. त्याकरिता उमेदवाराने वेळोवेळी महानगरपालिकेचे वेबसाईटचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील.

१५ भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

१६ उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २००० / प्र. क्र. ६१/२००१ / ३९, दि.१९/०३/२००३ नुसार संगणक हाताळणीबाबतची शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल. माहिती व तंत्रज्ञान (साप्रवि) विभाग, शासन निर्णय क्र. मातंस - २०१२ /प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये विहित केलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्य उमेदवारांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

१७ निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवानियम/ ठाणे महानगरपालिका सेवा विनियम लागू होतील.

१८ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो/१००५/१२६ सेवा- ४ दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्ती योजना (Defined Contribution Pension System) लागु राहील.

१९ शासन निर्णय क्र. चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८/०८/२०१७ मधील तरतूदीनुसार निवड झालेल्या उमेदवाराची चारित्र्य पडताळणीच्या अधीन राहून ६ महिन्याच्या कालावधीकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल. मात्र ६ महिन्याच्या कालावधीत चारित्र्य पडताळणीचा अहवाल प्राप्त न झाल्यास अथवा त्यांच्या चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

२० महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि.२८/०३/२००५ व क्र. एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि.०१/०७/२००५ नुसार लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

२१ निवड यादीतील उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित झाल्यानंतर रुजू होणेपूर्वी. उमेदवाराची महापालिकेच्या किंवा / शासकीय रुग्णालयामार्फत / वैद्यकीय मंडळामार्फत वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीय दृष्ट्या अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२२ उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे . त्याकरीता इयत्ता दहावी मध्ये मराठी विषयात किमान आवश्यक गुणांसह अर्हता धारण केली असणे आवश्यक आहे.

२३ सदर भरती अंतर्गत नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमत्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा / अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व दोन वर्षानंतरचे सेवासातत्यबाबत उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरी विचारात घेऊन ठरविले जाईल.

२४ वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांची ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही रुग्णालय/आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या

कोणत्याही रुग्णालय/आरोग्य केंद्रात बदली योग्य असेल. उमेदवारांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार विविध विभागात काम करावे लागेल. नियुक्ती नंतर बदली पदस्थापनेसाठी गैरवाजवी दबाव आणल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.

२५ नियुक्ती झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

९ **अर्ज भरण्याबाबतच्या तसेच ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याच्या सुचना:-**

१ www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर **(ई-सुविधा या सदराखाली (भरती /Recruitment) येथे क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link For Applying For the post of Dean, Medical Officer Of Health, Professor, Associate Professor, Lecturer, Dental Medical Officer & Medical Officer (अधिष्ठाता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता, दंत वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी)) या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे**. सदर जाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२ ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाच्या उजवीकडे असलेल्या "Apply" या ठिकाणी क्लिक करावे. त्यानंतर भ्रमणध्वनीची वैधता तपासण्यासाठी माहिती भरावी. "send OTP" वर क्लिक केल्यावर अर्जदाराच्या भ्रमणध्वनीवर आलेला OTP क्रमांक नमुद करुन अर्ज भरण्याची पुढील कार्यवाही करावी.


३ अर्जदाराचे भ्रमणध्वनीवर युजर आयडी व पासवर्ड प्राप्त होईल. त्यास जतन करावे.

४ फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे:-

उमेदवारांने स्वत:चे छायाचित्र/फोटो व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन (JPEG फॉरमॅटमध्ये Size less than २०० kb ) मध्ये अपलोड करणे आवश्यक राहील. उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ x उंची ४.५ से.मी) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

- एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकीत करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून स्कॅन करता येईल.
- फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.

फोटो रुंदी ३.५ से.मी.



फोटो उंची ४.५ से.मी

- छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते मुलाखतीच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.
- विहीत आकार / क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या पेनाने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.
- उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.
- वरील प्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.
- फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेजची स्कॅन करुन JPEG फॉरमेटमध्ये संगणकावर

वेगवेगळ्या फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (save) करावी. फोटो तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी २०० kb पेक्षा जास्त असता कामा नये. या पेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्विकारली जात नाही. इमेजची साईज २०० kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी setting adjust करावे.

- स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षर, हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल. प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५ नोंदणी व अर्ज भरण्याची स्वत:करणे आवश्यक राहील. अन्य व्यक्तीने अर्ज भरल्याची सबब अर्ज फेटाळला गेल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

६ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.thanecity.gov.inया संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती (स्कॅन केलेली कागदपत्रे) इत्यादी आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

७ महिला उमेदवारांनी पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

८ एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची मुळ प्रत / विवाह नोंदणीची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

९ पत्रव्यवहाराचा स्वत:चा पत्ता लिहावा व्यवसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

१० संगणक प्रक्रियाकरीता अर्ज मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती (Capital Letters) मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbrevations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

११ उमेदवाराने आपला वैध ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई -मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अंतिम निकाल लागेपर्यंत कार्यरत असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनीवर संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना ठाणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. मुलाखतीबाबतचा संदेश ई-मेल / एस.एम.एस द्वारे कळविण्यात येईल. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

१२ एस.एस.सी./ मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला या प्रमाणपत्रावरील जन्मदिनांकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा.

१३ स्त्री / पुरुष संदर्भात संबंधित पर्याय निवडावा.

१४ वैवाहीक माहिती बाबत सुयोग्य पर्याय निवडावा.

१५ अपत्यांबाबतचा तपशील, जन्म दिनांक बिनचुक पणे योग्य तपशील नमुद करावा.

१६ उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७ उमेदवाराने अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम कारवाईसंबंधीची माहिती देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

१८ उमेदवारांस ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या पदांची जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण करीत असल्याची व अन्य आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१९ आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय उमेदवार निवडीस पात्र राहणार नाही. केवळ मुलाखत दिल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेचा अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

२० उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर सबमिट (Submit) केल्यावर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

२१ उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई - मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चूकल्यास त्यास केवळ उमेदवार जबाबदार राहील.

२२ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

२३ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती, दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

२४ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

२५ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे अर्जासोबत अपलोड न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जामधील दावा/ माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

| **अ.क्र.** | **आवश्यक प्रमाणपत्र** |
|---|---|
| **१** | जन्मचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / अधिवास प्रमाणपत्र |
| **२** | जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र |
| **३** | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) |
| **४** | एस.एस.सी. |
| **५** | एच.एस.सी. |
| **६** | एम.एस.सी.आय.टी. |
| **७** | एम.बी.बी.एस |
| **८** | संबंधीत पदाच्या विषयातील प्राप्त संस्थेची / विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका |
| **९** | अनुभव प्रमाणपत्र |
| **१०** | शासन / निमशासकीय सेवेतील अर्जदार संबंधित संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र |
| **११** | विवाह नोंदणीप्रमाणपत्र किंवा राजपत्र आवश्यकते प्रमाणे. |

२६ पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट मुळाखतीच्या वेळी तसेच कागदपत्र तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

२७ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्या अनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्त कोणत्याही

माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती दिली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मागवून माहिती मिळाली नाही तरी ही, तक्रार करता येणार नाही. तक्रार केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

२८ ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भातील संगणीकीय प्रणाली संदर्भात अडी अडचणी असल्यास ७३५८७१२४१४/७७१८८२५७५७ या दुरध्वनी क्रमांकावर सोमवार ते रविवार सकाळी ९.०० ते रात्रौ ०८.०० या वेळेत संपर्क साधावा किंवा अर्ज भरण्यासंबंधी ई-मेल पाठविल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर किंवा ई-मेल आयडीवर संदेश पाठविण्यात येईल उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

२९ पात्र उमेदवारांची नावे संकेतस्थळावर प्रसिध्द केली जातील. तथापी जे अर्जदार मुलाखतीसाठी पात्र ठरणार नाहीत अशा अर्जदारांना याबाबत वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही आणि अर्जदारास त्याबाबत विचारणा करता येणार नाही. त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार इकडून केला जाणार नाही. तसेच यासंबंधित कोणतीही तक्रार दाखल करता येणार नाही. अशा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

३० उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३१ ऑनलाईन अर्ज भरताना शेवटच्या दिवशी एकाच वेळी अनेक ठिकाणाहुन इच्छुक उमेदवार अर्ज भरत राहीले तर तांत्रिक अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी उमेदवारानी शेवटच्या दिवसाची अंतिम कालावधीची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज सादर करावा. याबाबत उमेदवारास अर्ज सादर करण्यासाठी कोणतीही वाढीव मुदत देण्यात येणार नाही. तसेच यासंबंधित कोणतीही तक्रार दाखल करता येणार नाही. अशा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**१० विशेष सूचना :-**

१. पदभरतीच्या अटीशर्तीमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहिल.

२. महापालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे ही महापालिकेच्या अभिलेखाचा भाग होईल.

३. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

४. ठाणे महानगरपालिकेमधील पदभरती ही पूणपणे महाराष्ट्र शासनाकडून घालून दिलेल्या नियमानुसार पारदर्शक पध्दतीने करण्यात येते. अर्जदाराना सर्तक करण्यात येते की त्यांनी कोणत्याही परिस्थितीत भरती साठी अनैतीक, बेकायदेशीर अवलंब करु नये. निवड यादी मध्ये नाव येण्या साठी केवळ आणि केवळ उमेदवाराची गुणवत्ता विचारात घेतली जाते. कोणत्याही अन्य प्रलोभणास बळी पडणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

५. यापुर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे.

६. उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशील देऊ नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये.

स्वा /-
(संजीव जयस्वाल)
महापालिका आयुक्त
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**प्रत :- प्रसिध्दीसाठी ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर**

स्वा /-
(ओमप्रकाश दिवटे)
उपआयुक्त (मुख्यालय)
ठाणे महानगरपालिका, ठाणे